# टाटा पॉवर-टीचा कार्यकारी सारांश

## आर्थिक वर्ष २०११-१२ करिता सत्य पडताळा याचिका त्याबरोबरच आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता बहु-वर्षीय टॅरिफ (एमव्हायटी) याचिका

**विषयानुक्रम**........................................................................I

**तक्ते**

**सूची**.................................................................................III

**संक्षिप्ताक्षरांची सूची**...............................................................V

**१.कार्यकारी सारांश**

१.१ एमवायटी नियमावली २०११ खाली दाखलीकरण

१.२ आ.व. २०११-१२ ते आ.व. २०१५-१६ या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर)/बहु-वर्षीय टॅरिफ (एमवायटी)

१.३ मागील वसूलीसहित वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर)

# LIST OF TABLES

तक्ते सूची

तक्ता १-१ : मागील वसूली........................................................................३

तक्ता १-२ : भांडवली खर्च आणि भांडवलीकरण.......................................................३

तक्ता १-३ : इक्विटीवरील परतावा...................................................................३

तक्ता १-४ : कर्जाऊ भांडवलावरील व्याज...........................................................३

तक्ता १-५ : चालू भांडवलावरील परतावा...........................................................३

तक्ता १-६ : घसारा.........................................................................................३

तक्ता १-७ : ओ आणि एम खर्च........................................................................३

तक्ता १-८ : आयकर.......................................................................................३

तक्ता १-९ : वैधानिक विनियोग........................................................................३

तक्ता १-१० : बिगर-टॅरिफ उत्पन्न.....................................................................३

तक्ता १-११ : आ.व. २०११-१२ साठी एआरआर आणि आ.व. २०१२-१३ ते २०१५-१६ साठी वार्षिक पारेषण आकार.............................................................................३

तक्ता १-१२: आ.व. २०११-१२ साठी महसूल......................................................३

तक्ता १-१३ : आ.व. २०११-१२ साठी निव्वळ वार्षिक पारेषण आकार आणि तूट....................३

तक्ता १-१४ : आ.व. २०११-१२ साठी निव्वळ (तूट)/शिल्लक......................................३

तक्ता १-१५: नियंत्रण कालावधीसाठी मागील वसूलीसह वार्षिक महसूल आवश्यकता.................... ३

# LIST OF ABBREVIATIONS

संक्षिप्ताक्षरांची सूची

| संक्षिप्ताक्षरे | वर्णन |
|---|---|
| ए आणि जी | प्रशासन आणि सामान्य |
| एपीआर | वार्षिक कामगिरी आढावा |
| एआरआर | वार्षिक महसूल आवश्यकता |
| एएस | लेखा मानक |
| एटीई | विद्युत अपिलीय लवाद |
| कॅपेक्स | भांडवली खर्च |
| सीपीआय | ग्राहक किंमत निर्देशांक |
| सीआरएस | कोटी |
| सीडब्ल्यूआयपी | चालू असलेले भांडवली काम |
| डीपीआर | तपशीलवार प्रकल्प अहवाल |
| ईए २००३ | विद्युत अधिनियम, २००३ |
| एफवाय (आ.व.) | आर्थिक वर्ष |
| जीएफए | ढोबळ स्थिर मालमत्ता |
| जीओएम | महाराष्ट्र शासन |

| संक्षिप्ताक्षरे | वर्णन |
|---|---|
| एचओ | मुख्य कार्यालय |
| एचटी | उच्च दाब |
| आयडीसी | बांधकामादरम्यानचे व्याज |
| आयटी | आयकर |
| केव्ही | किलो व्होल्ट |
| केव्हीए | किलो व्होल्ट ॲम्पिअर |
| केडब्ल्यूएच | किलो वॉट तास |
| एलए | परवानाप्राप्त क्षेत्र |
| एलटी | लघु दाब |
| एमईआरसी | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग |
| एमएसईटीसीएल | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड |
| एमयू | दशलक्ष युनिट्स |
| एमव्हीए | मेगा व्होल्ट ॲम्पिअर |
| एमडब्ल्यू | मेगावॉट |
| एमवायटी | बहुवर्षीय टॅरिफ |
| ओ आणि एम | प्रचलन आणि देखभाल |
| पीएलआर | कर्ज देण्याचा प्राथमिक दर |

| संक्षिप्ताक्षरे | वर्णन |
|---|---|
| पीपीए | वीज खरेदी करार |
| आर आणि एम | दुरुस्ती व देखभाल |
| आर-इन्फ्रा | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर |
| आरओई | इक्विटीवरील परतावा |
| आरएस. | रुपये |
| एसएस | पाठिंबा सेवा |
| एसटीयू | राज्य पारेषण पुरवठा सुविधा |
| टीओडी | दिनकालीन वेळ |
| टाटा पॉवर | टाटा पॉवर कंपनी लिमिटेड |
| टाटा पॉवर-जी | टाटा पॉवर कंपनी लिमिटेडचा निर्मिती व्यवसाय |
| टाटा पॉवर-डी | टाटा पॉवर कंपनी लिमिटेडचा वितरण व्यवसाय |
| टाटा पॉवर-टी | टाटा पॉवर कंपनी लिमिटेडचा पारेषण व्यवसाय |

# 1 EXECUTIVE SUMMARY

## १ कार्यकारी सारांश

टाटा पॉवर कंपनी लिमिटेड (''टाटा पॉवर'') ही १९१९ साली स्थापन झालेली कंपनी आहे. १ एप्रिल २००० रोजी हाइड्रो-इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१० मध्ये स्थापना) आणि आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी लिमिटेड (१९१६ मध्ये स्थापना) या कंपन्या टाटा पॉवरमध्ये विलीन करण्यात आल्या आणि त्या सर्वांची मिळून एक एकत्रित कंपनी बनली. या विलीनीकरणामुळे वरील दोन कंपन्यांचे परवानेसुद्धा विलीन करण्यात आले. आणि दिनांक १२ जुलै २००१ च्या ठराव क्र. आयइए - २००१/सीआर-१०५०९/एनआरजी - १ अन्वये महाराष्ट्र सरकारने टाटा पॉवरला त्यांच्या मुंबई परवाना क्षेत्रातील सर्वसाधारण जनतेला विद्युत पुरवठा करण्यासाठी तसेच वितरण परवानाधारकांना एकगठ्ठा विद्युत पुरवठा करण्यासाठी परवाना दिला.

विद्युत कायदा बनल्यानंतर आणि या सन्माननीय आयोगाने परवाना नियमावली जाहीर केल्यानंतर एक मानित परवानाधारक म्हणून टाटा पॉवरने विद्युत कायदा २००३ शी सुसंगत ठरण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी आपला परवाना सादर केला.

टाटा पॉवरला विद्युत कायदा २००३ खाली मानित पारेषण परवानाधारक (''टाटा पॉवर-टी'') म्हणून या सन्माननीय आयोगाने मान्यता दिली आहे.

### १.१ एमवायटी नियमावली २०११ खाली दाखिलीकरण

सन्माननीय आयोगाने ४ फेब्रुवारी २०११ रोजी एमवायटी नियमावली जारी केली. या एमवायटी नियमावलीच्या परिच्छेद ७.१ नुसार टाटा पॉवर-टी सारख्या पारेषण परवानाधारकाने १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१६ या पाच अर्थिक वर्षांचा समोवश असलेल्या नियंत्रण कालावधीसाठी 'व्यवसाय योजना' दाखल करणे आवश्यक आहे. टाटा पॉवर-टी ने अशी व्यवसाय योजना सन्माननीय आयोगाकडे स्वतंत्रपणे दाखल केली होती. सन्माननीय आयोगाने या व्यवसाय योजनेवर २८ जून २०१२ रोजी आदेश जारी केला (''व्यवसाय योजना आदेश''), ज्यामध्ये स्वीकृत व्यव्यवसाय योजना आधारभूत घेऊन नियंत्रण कालावधीसाठी (आ.व. २०१२-१३ ते आ.व.२०१५-१६) एमवायटी याचिका व सोबत आ.व. २०११-१२ साठीचा एआरअर दाखल करण्याचा टाटा पॉवर-टीला निर्देश देण्यात आला आहे.

### १.२ दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एआरआर/एमवायटी-आ.व. २०११-१२ ते आ.व.२०१५-१६

टाटा पॉवरने या याचिकेत दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या वेगवेगळ्या वर्षांसाठी एकत्रित महसूल आवश्यकता सादर केली आहे. सन्माननीय आयोगाच्या निर्देशांना अनुसरुन आ.व. २०११-१२ साठीची एआरआर जूनी एमईआरसी टॅरिफ नियमावली, २००५ वापरुन काढण्यात आली तर उर्वरित चार वर्षांसाठी म्हणजे आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ साठीची एआरआर नवीन एमवायटी नियमावली, २०११ वापरुन आणि सन्माननीय आयोगाने त्यांच्या २८ जून २०१२ तारखेच्या आदेशात स्वीकृत केलेल्या व्यवसाय योजनेचा आधार घेऊन काढण्यात आली आहे.

या संदर्भात, सन्माननीय आयोगाने त्यांच्या व्यवसाय योजना आदेशांत (i) स्वीकृत योजना आणि (ii) सन्माननीय आयोगाकडे स्वीकृतीसाठी सादर केलेल्या योजना यासाठी भांडवलीकरणाचा विचार केला आहे. व्यवसाय योजना सादर केल्यानंतर निघून गेलेल्या काळात सन्माननीय आयोगाकडे स्वीकृतीसाठी पाठवलेल्या काही थोड्या डीपीआरचा समावेश झाला आहे. आताच्या एमवायटी याचिकेत त्याच्या परिणामचा आम्ही समावेश केला आहे.

आ.व. २०११-१२ समाप्त झाले असल्यामुळे टाटा पॉवर-टी पारेषण कार्यासाठी आ.व. २०११-१२ साठीची ही वार्षिक महसूल आवश्यकता याचिका प्रत्यक्ष कामगिरीवर आधारुन दाखल करत आहे. त्याचप्रमाणे आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ या कालावधीचे प्रक्षेपित अंदाज (व्यवसाय योजना आदेशात दिलेल्या रक्कमांच्या संदर्भाने) सुधारित केले आहेत जेणेकरुन आ.व. २०११-१२ च्या प्रत्यक्ष कामगिरीचा अंतर्भाव करता येईल.

आ.व. २०११-१२ ची कामगिरी एमईआरसी टॅरिफ नियमावली २००५ च्या आधारे दाखल करण्याच्या निर्देशाविरुद्ध टाटा पॉवरने विद्युत अपिलीय लवादाकडे (एटीई) अपील दाखल केले आहे. सन्माननीय एटीईचा जे निर्णय येईल त्यानुसार खर्चात योगय ती जुळवणूक करण्याचा हक्क टाटा पॉवर-टी राखून ठेवत आहे. आ.व. २०११-१२ साठीची आणि उर्वरित नियंत्रण कालावधीसाठी, म्हणजे आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ साठी पारेषण परवानाधारकाच्या वार्षिक महसूल आवश्यकता स्वतंत्रपणे काढण्यात आल्या आहेत आणि त्यांचे तपशील **विभाग४: आ.व. २०११-१२ साठी वार्षिक महसूल आवश्यकता (एआरआर) आणि विभाग ५: आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ या नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक महसूल आवश्यकतेचे (एआरआर) प्रक्षेपित अंदाज यामध्ये सादर केले आहेत.**

आ.व. २००९-१० साठी एकत्रित महसूल आवश्यकतेचा सत्य पडताळा आणि आ.व. २०१०-११ साठीचा वार्षिक कामगिरी आढावा यांच्या मंजूरीसाठी टाटा पॉवर-टी ने याचिका दाखल केली होती. २०११ च्या बाब क्र. १०६ मधील या याचिकेवर सन्माननीय आयोगाने दिनांक ४ फेब्रुवारी २०१२ रोजी आदेश पारित केला. या आदेशात सन्माननीय आयोगने मंजूरी दिल्यानुसार मागील कालावधीसाठीची (तूट)/अतिरिक्त शिल्लक सादर

करणे टाटा पॉवर-टी योग्य समजते. परंतु आदेशातील काही मुद्यांसंबंधाने टाटा पॉवर ने एटीईकडे अपील केले आहे. सन्माननीय एटीईचा जो निर्णय येईल त्यानुसार खर्चात योग्य ती जुळवणूक मागण्याचा हक्क टाटा पॉवर-टी राखून ठेवत आहे.

### १.२.१ मागील कालाववधीसंबंधाने वसूली

सन्माननीय आयोगाने त्यांच्या १४ फेब्रुवारी २०१२ च्या आदेशाद्वारे मंजूर केल्यानुसार आ.व. २०१२-१३ साठी व्याजासहितची (तूट)/अतिरिक्त शिल्लक ८.६६ कोटी रु. इतकी आली.

**तक्ता १-१ : मागील वसूली**

रु. कोटी

| | | **स्वीकृत रक्कम** |
|---|---|---|
| १ | १४ फेब्रुवारी २०११ च्या एटीई आदेशाचा परिणाम | - |
| २ | आ.व. २००८-०९ साठी त्या वर्षात पुनर्प्रतिष्ठापित इक्विटीच्या परिणामामुळे आरओईची वाढीव वसूली | (१.३३) |
| ३ | आ.व. २००९-१० साठी (तूट)/शिल्लक | १.९० |
| ४ | आ.व. २०१०-११ साठी (तूट)/शिल्लक | ७.०० |
| ५ | आ.व. २०११-१२ साठी १४.३९ टक्के या एसबीआय पीएलआर दराने व्याज | १.०९ |
| ६ | **एकूण** | **८.६६** |

### १.२.२ नियंत्रण कालावधीमधील भांडवलीकरण

आ. व. २०११-१२ साठी प्रत्यक्ष भांडवली खर्च आणि भांडवलीकरण आणि आ. व. २०१२-१३ ते आ. व. २०१५-१६ साठीच्या व्यवसाय योजनेमध्ये स्वीकृत तत्वांच्या आधारे भांडवली खर्च आणि भांडवलीकरण टाटा पॉवर-टी ने खालील तक्त्यात सादर केले आहे.

,

**तक्ता १-२ : भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

रु. कोटी

| वर्ग | भांडवली खर्च | | | | | भांडवलीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
| डीपीआर | ३३९.६५ | ७६८.२३ | ८३६.०५ | ९३३.६८ | ५०४.७६ | २५४.२६ | ७१६.५१ | ३७८.४५ | १०५०.२६ | १२३९.८० |
| बिगर-डीपीआर | ३१.२६ | ३४.१८ | १६.४९ | ६.१६ | ६.४९ | २०.४६ | ३२.९९ | २०.६४ | ६.३६ | ६.४९ |
| एचओ/एसएस | ३.८१ | ५.०० | ५.०० | ५.०० | ५.०० | ३.८१ | ५.०० | ५.०० | ५.०० | ५.०० |
| **एकूण** | ३७४.७२ | ८०७.४१ | ८५७.५३ | ९४४.८४ | ५१६.२५ | २७८.५३ | ७५४.५० | ४०४.०९ | १०६१.६२ | १२५१.२९ |

### १.२.३ इक्विटीवरील परतावा

टाटा पॉवर-टी ने आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ या कालावधीसाठी इक्विटीवरील परताव्याचे मूल्यमापन एमईआरसी (एमवायटी नियमावली) २०११ च्या आधारे केले आहे, तर आ. व. २०११-१२ साठी टॅरिफ नियमावली २००५ अनुसार इक्विटीवरील परतावा काढण्यात आला आहे.

**तक्ता १-३ : इक्विटीवरील परतावा**

(रु.कोटी)

| अनु क्र. | तपशील | आ. व. २०११- | आ.व. २०१२- | आ.व. २०१३- | आ.व. २०१४- | आ.व. २०१५- |
|---|---|---|---|---|---|---|

| | | १२ (प्रत्यक्ष) | १३ | १४ | १५ | १६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **वर्षाच्या सुरुवातीला नियंत्रणात्मक इक्विटी** | **५६१.१४** | **६४४.२६** | **८७०.२०** | **९८९.४८** | **१,३०६.४९** |
| २ | उणे:वर्षभरात नि:भांडवलीकरण केलेल्या/निवृत्त केलेल्या मालमत्तेचा इक्विटी भाग | (०.४३) | (०.४२) | (१.९४) | (१.४८) | (०.१९) |
| ३ | भांडवलीकरण | २७८.५३ | ७५४.५० | ४०४.०९ | १,०६१.६२ | १,२५१.२९ |
| ४ | भांडवलीकरणाचा इक्विटी भाग | ८३.५६ | २२६.३५ | १२१.२३ | ३१८.४९ | ३७५.३९ |
| ५ | **वर्षाच्या शेवटी नियंत्रणात्मक इक्विटी** | **६४४.२६** | **८७०.२०** | **९८९.४८** | **१,३०६.४९** | **१,६८१.७०** |
| | परताव्याची गणती | | - | – | - | – |
| ६ | वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या नियंत्रणात्मक इक्विटीवरील परतावा | ७८.५६ | ९९.८६ | १३४.८८ | १५३.३७ | २०२.५१ |
| ७ | भांडवलीकरणाच्या इक्विटी भागावरील परतावा | ५.८२ | १७.५१ | ९.२४ | २४.५७ | २९.०८ |
| ८ | **नियंत्रणात्मक इक्विटीवरील एकूण परतावा** | **८४.३८** | **११७.३७** | **१४४.१३** | **१७७.९४** | **२३१.५८** |

## १.२.४ व्याज आणि वित्त आकार

व्याज खर्चाची गणती खालील तीन शीर्षाखाली करण्यात आली आहे:

- कर्जावरील व्याज
- चालू भांडवलावरील व्याज
- इतर वित्तीय आकार

- **कर्जावरील व्याज**

आ. व. २००३-०४ ते आ.व. २०१०-११ मधील भांडवलीकरणाच्या निधी पुरवठ्यासाठीच्या कर्जा व्यतिरिक्त टाटा पॉवर-टीने आ.व. २०११-१२ आणि आ.व. २०१२-१३ मधील भांडवलीकरणाला निधी पुरवण्यासाठी नवीन कर्ज घेतले आहे. आ.व. २०११-१२ आणि आ.व. २०१२-१३ साठी भांडवलीकरणाला निधी पुरवण्यासाठी घेतलेल्या कर्जाचा तपशील विभाग ५.५ मध्ये दिला आहे. कार्जाऊ

भांडवलावरील आ.व. २०११-१२ साठी प्रतयक्ष व्याज आणि आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ साठीचे प्रक्षेषित व्याज खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता १-४ कर्जाऊ भांडवलावरील व्याज**

रु. कोटी

| तपशील | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ३८४.३१ | ५५०.०३ | १,०००.६६ | १,१७७.२८ | १,७७५.०५ |
| वाढ | १९४.९७ | ५२८.१५ | २८२.८६ | ७४३.१४ | ८७५.९० |
| परतफेड | २९.२६ | ७७.५१ | १०६.२५ | १४५.३६ | २०७.५१ |
| अंतिम शिल्लक | ५५०.०३ | १,०००.६६ | १,१७७.२८ | १,७७५.०५ | २,४४३.४५ |
| व्याज दर | १०.८८% | १०.८७% | १०.९६% | १०.९८% | १०.९९% |
| **एकूण व्याज खर्च** | **५०.८२** | **८४.२५** | **११९.४०** | **१६२.०९** | **२३१.७९** |

एमवायटी नियमावली, २०११ च्या नियम ३३.५ ला अनुसरुन टाटा पॉवर-टीने आ.व. २०१२-१३ ते आ.व.२०१५-१६ साठी त्या त्या वर्षासाठी आधीच्या कर्जाच्या प्रारंभिक शिल्लकीवर आधारित भारित सरासरी व्याज दर विचारात घेतला आहे. तसेच, निर्देशात्मक कर्जांसाठीचा व्याजदर वरील गणतीनुसारच्या भारित सरासरी दराने आकारण्यात आला आहे.

- **चालू भांडवलावरील व्याज**

चालू भांडवलावरील व्याजाची गणती आ.व. २०११-१२ साठी टॅरिफ नियमावली, २००५ मध्ये नमूद केलेल्या घटकांचा आधार घेऊन आणि आ.व २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ कालावधीसाठी एमवायटी नियमावली २०११ चा आधार घेऊन करण्यात आली आहे.

आ.व. २०११-१२ साठी चालू भांडवलावरील व्याजाच्या गणतीसाठी आ.व. २०११-१२ मध्ये प्रचालित असलेल्या एसबीआयच्या भारित सरसरी अल्प कालीन पीएलआरचा आधार घेऊन १४.३९ टक्के हा भारित सरासरी व्याज दर विचारात घेण्यात आला आहे. नियंत्रण कालावधीच्या उर्वरित वर्षासाठी १४.७५ टक्के हा व्याज दर विचारात घेण्यता आला जो ही याचिका दाखल करताना प्रचलित असलेला दर होता.

तक्ता १-५: चालू भांडवलावरील व्याज

(रु.कोटी)

| अनु क्र. | तपशील | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रचलनात्मक आणि देखभाल खर्चाच्या एक बारांश रक्कम | १०.२४ | १२.५९ | १४.३२ | १६.५५ | २०.४९ |
| २ | स्टोअर्स, सामग्री आणि पुरवठ्याच्या एकूण पुस्तकी मूल्याच्या एक बारांश रक्कम | १६.९८ | १६.९८ | १६.९८ | १६.९८ | १६.९८ |
| ३ | दीड महिन्याच्या समतूल्य पारेषण आकार | ४२.२३ | ५६.७१ | ७०.८२ | ८९.१० | ११८.९७ |
| ४ | **एकूण चालू भांडवल** | **६९.४४** | **८६.२८** | **१०२.१२** | **१२२.६३** | **१५६.४५** |
| | | | | | | |
| | **चालू भांडवलावरील व्याजाची गणती** | | | | | |
| ५ | व्याज दर (%) | १४.३९% | १४.७५% | १४.७५% | १४.७५% | १४.७५% |
| ६ | **चालू भांडवलावरील व्याज** | **१०.००** | **१२.७३** | **१५.०६** | **१८.०९** | **२३.०८** |

- **इतर वित्तीय आकार**

आ.व. २०११-१२ साठी इतर वित्तीय आकार ०.०१ कोटी रु. होते.

## १.२.५ घसारा

टाटा पॉवर-टी ने आ.व. २०११-१२ साठी एमईआरसी (टॅरिफच्या अटी व शर्ती). २००५ मध्ये नमूद केलेले दर लागू करुन आणि आ. व. २०१२-१३ ते आ. व. २०१५-१६ या कालावधीसाठी एमवायटी नियमावली, २०११ मध्ये नमूद केलेले दर लागू करुन घसाऱ्याची गणती केली आहे. याप्रकारे काढण्यात आलेला घसारा खालील तक्त्यात दिल्यानुसार आहे:

तक्ता:१-६: घसारा

रु.कोटी

| तपशील | आ. व. २०११- | आ.व. | आ.व. | आ.व. | आ.व. |
|---|---|---|---|---|---|

| | १२ (प्रत्यक्ष) | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक जीएफए | १,५६४.४३ | १,८४१.५१ | २,५९४.६३ | २,९९२.२६ | ४,०४८.९६ |
| एकूण घसारा | **३९.५१** | **७७.५१** | **१०६.२५** | **१४५.३६** | **२०७.५१** |
| सरासरी घसारा (%) | २.५३% | ४.२१% | ४.०९% | ४.८६% | ५.१३% |

### १.२.६ ओ आणि एम खर्च

आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ साठी ओ आणि एम खर्चाचा अंदाज व्यवसाय योजनेत मंजूर केलेल्या भांडवलीकरणानुसार नियंत्रण कालावधीत कार्यरत असणे अपेक्षित असलेल्या बें ची संख्या आणि तार लांबी विचारात घेऊन काढण्यात आला आहे. एमवायटी नियमावली, २०११ मध्ये दिलेली निर्देशात्मक मूल्ये लागू करुन नियंत्रण कालावधीसाठी ओ आणि एम खर्चाचा प्रक्षेपित अंदाज काढण्यात आला आहे. आ.व. २०११-१२ साठी टॅरिफ नियमावली, २००५ ला अनुसरुन प्रत्यक्ष सोसण्यात आलेला ओ आणि एम खर्च सादर केला आहे. नियंत्रण कालावधीसाठी ओ आणि एम खर्चाचे प्रक्षेपित अंदाज खालील तक्त्यात दिल्यानुसार आहेत:

**तक्ता १-७: प्रचलन आणि देखभाल (ओ आणि एम) खर्च**

रु. कोटी

| ओ आणि एम खर्च | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| **निर्देश्यात्मक-बे (रु.लाख/बे)** | | | | | |
| ४०० केव्हीपेक्षा जास्त | | ९९.११ | १०४.७८ | ११०.७८ | ११७.११ |
| ६६ आणि ४०० केव्ही दरम्यान | | ३०.१२ | ३१.८५ | ३३.६७ | ३५.६० |
| ६६ केव्ही पेक्षा कमी | | ६.३० | ६.६६ | ७.०४ | ७.४४ |
| | | | | | |
| **निर्देशात्मक-पारेषण रेखा (रु.लाख/सर्किट कि.मी)** | | | | | |
| ४०० केव्ही पेक्षा कमी | | ०.५६ | ०.५९ | ०.६३ | ०.६६ |
| ६६ केव्ही आणि ४०० केव्ही दरम्यान | | १.१६ | १.२२ | १.२९ | १.३७ |
| **ओ आणि एम खर्च** | १२२.८२ | **१५१.१४** | **१७१.८३** | **१९८.६१** | **२४५.९१** |

### १.२.७ आयकर

आ.व. २०११-१२ साठी आयकराची गणती टाटा पॉवर-पारेषणला झालेल्या प्रत्यक्ष उत्पन्नाच्या आधारे करण्यात आली आहे. एमवायटी नियमावली २०११ ला अनुसरुन आ.व २०१२-१३ ते आ.व २०१५-१६

या कालावधीसाठीचा आयकर उपलब्ध असलेल्या सर्वात शेवटच्या लेखापरीक्षित लेखा आधारे म्हणजे आ.व. २०११-१२ साठीच्या लेखा आधारे काढण्यात आला आहे. आशा रीतीने लागू असणारा आयकर खालील तक्त्यात दर्शवल्यानुसार आहे:

**तक्ता: १-८: आयकर**

रु. कोटी

| तपशील | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| आयकर | ३७.०० | ३७.०० | ३७.०० | ३७.०० | ३७.०० |

## १.२.८ वैधानिम विनियोग

आ. व. २०११-१२ ते आ.व. २०१५-१६ या कालावधीसाठी आकस्मिक निधीसाठी योगदानाची मोजणी समाप्तीच्या जीएफएच्या ०.२५ टक्के दराने, हा दर जीएफएच्या ५ टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही हे बंधन पाळून, करण्यात आली आहे. आ.व. २०११-१२ ते आ.व. २०१५-१६ साठी वैधानिक विनियोग खालील तक्यात दिल्यानुसार येतो.

तक्ता: १-९: वैधानिक विनियोग

रु. कोटी

| तपशील | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| वैधानिक विनियोग | ४.६० | ६.४९ | ७.४८ | १०.१२ | १३.२५ |

## १.२.९ बिगर टॅरिफ उत्पन्न

आ.व. २०११-१२ साठी टाटा पॉवर-टीने प्रत्यक्षातील बिगर-टॅरिफ उत्पन्नाची तरतूद केली आहे ज्यामध्ये पुनरावर्ती आणि अ-पुनरावर्ती घटकांचा समावेश आहे. आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ या

कालावधीसाठीचे बिगर-टॅरिफ उत्पन्न सन्माननीय आयोगाने २०११ च्या बाब क्र. १६८ मधील व्यवसाय योजनेसाठी दिलेल्या दिनांक २८ जून, २०१२ च्या आदेशात संमत केलेल्या पातळीवर घेतले गेले आहे. बिगर-टॅरिफ उत्पन्न खालील तक्त्यात दर्शवल्यानुसार आहे:

**तक्ता: १-१०: बिगर टॅरिफ उत्पन्न**

रु. कोटी

| तपशील | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|
| बिगर टॅरिफ उत्पन्न | ११.८५ | ३२.८४ | ३४.५६ | ३६.३९ | ३८.३२ |

### १.२.१० पारेषण उपलब्धते संबंधाने प्रोत्साहनपर सवलत (इन्सेंटिव)

आ.व. २०११-१२ साठी टाटा पॉवरच्या पारेषण प्रणालीची उपलब्धता एसएलडीसीने प्रमाणित केल्यानुसार ९९.४६ टक्के होती. प्रत्यक्ष उपलब्धतेच्या आधारावर आ.व २०११-१२ साठी प्रोत्साहनपर सवलत ५.०३ कोटी रु. येते. २०१२ च्या बाब क्र. १६८ मध्ये सन्माननीय आयोगाने पारित केलेल्या दिनांक २८ जून, २०१२ च्या व्यवसाय योजना आदेशाच्या अनुषंगाने आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ या कालावधीसाठी प्रोत्साहनपर सवलत विचारात घेतलेली नाही. परंतु, त्या त्या वर्षाचा सत्य पडताळा सादर करताना त्याची गणती केली जाईल.

### १.२.११ वार्षिक महसूल आवश्यकता

आ.व. २०११-१२ साठीचे प्रत्यक्ष आकडे आणि आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ या कालावधीसाठी विविध घटकांसाठीचे प्रक्षेपित अंदाज यावर आधारुन वेगवेगळ्या वर्षांसाठीची एआरआर खालील तक्त्यात दर्शवली आहे:

**तक्ता: १-११: आ. व. २०११-१२ साठी एआरआर आणि आ.व. २०१२-१३ ते आ.व. २०१५-१६ साठी वार्षिक परेषण आकार**

| तपशील | आ. व. २०११-१२ (प्रत्यक्ष) | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ओ आणि एम आकार | १२२.८२ | १५१.१४ | १७१.८३ | १९८.६१ | २४५.९१ |
| दीर्घकालीन भांडवलावरील व्याज | ५०.८२ | ८४.२५ | ११९.४० | १६२.०९ | २३१.७९ |
| चालू भांडवलावरील व्याज | १०.०० | १२.७३ | १५.०६ | १८.०९ | २३.०८ |
| इतर वित्तीय आकार | ०.०१ | | | | |
| घसारा | ३९.५१ | ७७.५१ | १०६.२५ | १४५.३६ | २०७.५१ |
| इक्विटीवरील परतावा | ८४.३८ | ११७.३७ | १४४.१३ | १७७.९४ | २३१.५८ |
| आयकर | ३७.०० | ३७.०० | ३७.०० | ३७.०० | ३७.०० |
| वैधानिक वाटणी | ४.६० | ६.४९ | ७.४८ | १०.१२ | १३.२५ |
| **वार्षिक पारेषण आकार** | **३४९** | **४८६** | **६०१** | **७४९** | **९९०** |
| अधिक: इन्सेंटिव | ५.०३ | | | | |
| **एकूण पारेषण आकार** | **३५४** | **४८६** | **६०१** | **७४९** | **९९०** |
| उणे:बिगर टॅरिफ उत्पन्न | ११.८५ | ३२.८४ | ३४.५६ | ३६.३९ | ३८.३२ |
| उणे: टीपीसी-जी आरणि टीपीसी-डी च्या वाट्याचा एलसीसी खर्च | ४.५३ | | | | |
| **पारेषण टॅरिफपासून निव्वळ एकत्रित महसूल आवश्यकता** | **३३७.८०** | **४५३.६५** | **५६६.५८** | **७१२.८२** | **९५१.८०** |

### १.२.१२ आ.व. २०११-१२ च्या फायदा व तोट्याची हिस्सेदारी

टाटा पॉवर-टी साठी शेवटचा एआरआर आदेश २००९ च्या बाब क्र. ९७ मध्ये ३ सप्टेंबर, २०१० रोजी जारी करण्यात आला जो आ.व. २०१०-११ साठी लागू होता. एमवायटी नियमावली, २०११ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आ.व. २०११-१२ नियंत्रण कालावधीचा भाग असल्याने, टाटा पॉवरने संपूर्ण नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय योजना सादरीकरण केले होते ज्यामध्ये आ.व. २०११-१२ चा ही समावेश होता, परंतु, सन्माननीय आयोगाने निर्देश दिल्याप्रमाणे टॅरिफ नियमावली, २००५ आ.व. २०११-१२ साठी लागू आहे. यामुळे, आ.व. २०११-१२ साठी स्वीकृत आकडे उपलबध नाहीत ज्यांची तुलना प्रत्यक्ष कामगिरीशी करता येऊन आ.व २०११-१२ साठी फायदा आणि तोटा काढता येईल.

मात्र, आ.व. २०११-१२ साठीच्या खर्चाच्या समर्थनार्थ आणि फायदा व तोटा काढण्यासाठी, ३ सप्टेंबर २०१० च्या आदेशात आ.व. २०१०-११ साठी स्वीकृत केलेले आकडे आधारभूत घेऊन आणि सन्माननीय आयोगाने मागील आदेशांत स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानानुसार योग्य वाढ गुणक लागू करुन संबंधित आकडे काढण्यात आले आहेत. अशा रितीने काढण्यात आलेले संबंधित आकडे, प्रत्यक्ष खर्चाबरोबरीत त्यांची तुलना आणि तदनंतरचे फायदे आणि तोटे खाली दर्शवले आहेत:

- ओ आणि एम खर्चातील फायदा आणि तोटा

टाटा पॉवर-टीच्या फायद्या आणि तोट्याची हिस्सेदारी वर्णन केलेल्या टॅरिफ नियमावलीच्या तसेच खर्चाच्या विभागवारीच्या आधारावर काढण्यात आली आहे. या आधारावर टाटा पॉवर-टीचा निव्वळ हक्क १२२.८२ कोटी रु. इतका येतो.

### १.२.१३ आ.व. २०११-१२ साठी पारेषण व्यवसायातील महसूल

आ.व. २०११-१२ साठी अर्जित केलेला एकूण महसूल खालील तक्त्यात दिल्यानुसार येतो:

तक्ता:१-१२: आ.व. २०११-१२ साठी महसूल

रु.कोटी

| लागू असणारा टॅरिफ आदेश | प्रतिमहिना वसूल केला जाणारा पारेषण आकार | महिन्यांची संख्या | एकूण महसूल |
|---|---|---|---|
| १० सप्टेंबर,२०१० | २४.७३ | १२ | २९६.७३ |

### १.२.१४ आ.व. २०११-१२ साठी निव्वळ पारेषण आकार आणि (तूट)/अतिरिक्त शिल्लक

आ.व. २०११-१२ साठीच्या खर्चाची वर्गवारी, फायदा आणि तोट्याच्या हिस्सेदारीसाठी केलेल्या जुळवणूकीसह, खाली दिल्या प्रमाणे आहे:

तक्ता १-१३: आ. व. २०११-१२ साठी निव्वळ वार्षिक पारेषण आकार आणि तूट

| अनु क्र. | तपशील | आ.व.२०१०-११ साठी स्वीकृत आकडे | आ.व.२०११-१२ साठी लागू असणारे आकडे | नियमावलीनुसार हक्क | ग्राहकांबरोबर वाटून घेण्यात येणारा नियंत्रणाखालील घटकांपासूनचा कार्यक्षमता फायदा /(तोटा) | नियंत्रणाखालील घटकांपासूनच्या फायद्या/(तोट्या)च्या परिणामानंतर (निधीमध्ये केल्या गेलेल्या हस्तांतरणासहित) निव्वळ हक्क |
|---|---|---|---|---|---|---|
| I | महसूल | | | | | ३०८.५८ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | -पारेषण आकार | | | | | २९६.७३०० |
| | –इतर उत्पन्न | | | | | ११.८५ |
| **II** | **खर्च** | | | | | |
| १ | प्रचलन आणि देखभाल खर्च | | ११६.३ | १२२.८२ | | १२२.८२ |
| | कर्मचाऱ्यांवरील खर्च | ५९.२५ | ६७.० | | | |
| | आर आणि एम | १२.४६ | १३.३ | | | |
| | ए आणि जी | ३०.३६ | ३६.० | | | |
| २ | घसारा, घसारा सापेक्ष कर्जासहित | | | ३७.३२ | | ३७.३२ |
| ३ | दीर्घ कालीन भांडवलावरील व्याज | | | ४१.७२ | | ४१.७२ |
| ४ | चालू भांडवलावरील व्याज | | | १०.०० | | १०.०० |
| ५ | इतर वित्तीय आकार | | | ०.०१ | | ०.०१ |
| ६ | इन्सेंटिव (प्रोत्साहन पर सवलती) | | | ५.०३ | | ५.०३ |
| ७ | वैधानिक विनियोग/आकस्मिक निधी . | | | ४.६० | | ४.६० |
| ८ | आयकर | | | ३७.०० | | ३७.०० |
| ९ | इक्विटीवरील परतावा | | | ८०.३८ | | ८०.३८ |
| १० | उणे: टाटा पॉवर-जी आणि टाटा पॉवर-डीच्या वाट्याचा भार नियंत्रण खर्च | | | ४.५३ | | ४.५३ |
| **१०** | **एकूण खर्च** | | | **३३४.३६** | | **३३४.३६** |
| **III** | **आ.व. २०११-१२ साठी शुद्ध (तूट)/अतिरिक्त शिल्लक (I- II)** | | | | | **(२५.७८)** |

वरील तक्त्यात दिसून येते त्याप्रमाणे आ.व. २०११-१२ साठी शुद्ध तुट रु. (२५.७८) कोटी आहे जिची मोजणी फक्त आ.व. २०११-१२ साठी अर्जित महसूल आणि आ.व. २०११-१२ साठीचा खर्च यातील फरक या रितीने करण्यात आल आहे. अशा रितीने काढण्यात आलेली आ.व. २०११-१२ साठीची निव्वळ (तूट)/अतिरिक्त शिल्लक, मागील वसूलीसह, (१७.१२) कोटी रु. येते.

तक्ता: १-१४ आ.व. २०११-१२ साठी निव्वळ (तूट)/अतिरिक्त शिल्लक

| **अनु क्र.** | **तपशील** | |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | आ.व. २०११-१२ साठी शुद्ध (तूट)/अतिरिक्त शिल्लक | (२५.७८) |
| २ | २०११ च्या बाब क्र. १०६ मधील १४ फेब्रुवारी, २०१२ च्या आदेशानुसार (तूट)/अतिरिक्त शिल्लक | ८.६६ |
| ३ | **निव्वळ (तूट)/अतिरिक्त शिल्लक** | **(१७.१३)** |

## १.३ मागील वसूलीच्या समावेशासह एआरआर

अशी मागील वसूली विचारात घेतल्यानंतर नियंत्रण कालावधीच्या वेगवेगळ्या वर्षांसाठी एकूण एआरआर खालीलप्रमाणे आहे:

तक्ता १-१५ मागील वसूलींसह नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक महसूल आवश्यकता

| तपशील | आ.व. २०१२-१३ | आ.व. २०१३-१४ | आ.व. २०१४-१५ | आ.व. २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| वर्षासाठी एआरआर | ४५३.६५ | ५६६.५८ | ७१२.८२ | ९५१.८० |
| मागील वसूली/ ३१ ऑगस्ट २०१२ च्या एटीई आदेशाचा परिणाम* | ५१.८४ | | | |
| वसूल करावयाचा एकूण एआरआर | ५०५.४८ | ५६६.५८ | ७१२.८२ | ९५१.८० |

नियंत्रण कालावधीसाठी वरील एआरआरना कृपया मंजूरी द्यावी अशी सन्माननीय आयोगाला विनंती आहे.